पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १३७
<u>सभावृत्तांत</u>

दिनांक :- २०.१०.२००९ वेळ :- दुपारी ०२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार दिनांक २०.१०.२००९ रोजी दुपारी ०२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.भोंडवे गणेश तुकाराम
३. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
४. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
५. मा.अशोक दशरथ सोनवणे
६. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
७. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
८. मा.रामदास तानाजी कुंभार
९. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
१०.मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
११.मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख,मा.गायकवाड,मा.भोसेकर,मा.गावडे, मा.सावंत, मा.गायकवाड -सहा.आयुक्त,मा.काळे - नगरसचिव मा.जाधव, मा.कुदळे-कार्य.अभियंता, मा.माछरे-विशेष अधिकारी,मा.पोमण-संगणक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

ठराव क्रमांक :- ९४६२ विषय क्रमांक :- १
दिनांक - २०.१०.२००९ विभाग - ड प्रभाग
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.ड/निं/३/कावि/११०३/०९ दि.७/१०/२००९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ड प्रभाग कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील घंटागाडी ठेकेदार खर्च या लेखाशिर्षावर सन २००२-२००३ मध्ये र.रु.३०,०२,२७०/- इतका खर्च झाल्याने जादा झालेल्या र.रु.२२७०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९४६३ विषय क्रमांक :- २
दिनांक - २०.१०.२००९ विभाग - ड प्रभाग
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.ड/निं/३/कावि/११०२/०९ दि.७/१०/२००९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ड प्रभाग कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील नि.नो. क्र.५/१९९९-२००० अ.क्र.११ अन्वये, ड प्रभाग कार्यक्षेत्रातील औष्णीक धुरीकरण करणेबाबत पिकअप व्हॅन/टेंपो पुरविणेकामी मे.नितीन सुधाकर सुर्यवंशी [प्रतिदिन र.रु.२६०/-] या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने र.रु.७१,४००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४६४ विषय क्रमांक :- ३
दिनांक - २०.१०.२००९ विभाग - मुलेप कार्यालय
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेपं/१/कावि/१६८/०९दि.८/१०/२००९

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१४.९.२००९ ते दि.२०.९.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१६८/२००९ दि.८.१०.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४६५ विषय क्रमांक :- ४
दिनांक - २०.१०.२००९ विभाग - मुलेप कार्यालय
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेपं/१/कावि/१६९/०९दि.८/१०/२००९

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२१.९.२००९ ते दि.२७.९.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१६९/२००९ दि.८.१०.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४६६ विषय क्रमांक :- ५
दिनांक - २०.१०.२००९ विभाग - मुलेप कार्यालय
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेपं/१/कावि/१७०/०९दि.८/१०/२००९

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२८.९.२००९ ते दि.४.१०.२००९ अखेर संपणा-या

आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१७०/२००९ दि.८.१०.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४६७ विषय क्रमांक :- ६
दिनांक - २०.१०.२००९ विभाग - पशुवैद्यकिय
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पवै/१/कावि/६०१/०९दि.९/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मोकाट व भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित ठेवणेकामी केंद्र शासनाकडील असाधारन राजपत्र क्र.९२९ दि.२४ डिसेंबर २००१ चे मार्गदर्शक सुचनानुसार महापालिका हद्दीतील मोकाट कुत्र्यांवर संतती नियमन शस्त्रक्रिया कामकाजाकरीता या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्याने One Day Release पद्धतीने उपक्रम राबविणेकामी मे.पशु कल्याण मंडळ, परभणी यांना याकामी र.रु.३८५/- प्रति शस्त्रक्रिया (कुत्रा पकडणे, कुत्र्यांचे तक्रारीचे निवारण करणे, शस्त्रक्रिया शुल्क, औषधे, शस्त्रक्रिया साहित्य व इतर आवश्यक खर्चासह) इतके शुल्क अदा करणेस व मे.पशु कल्याण मंडळ,परभणी यांचेशी आवश्यक करारनामा करणेस व याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४६८ विषय क्रमांक :- ७
दिनांक - २०.१०.२००९ विभाग - आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.डप्र/७/कावि/८६९/०९दि.१४/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ड प्रभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामधील वॉर्ड क्र. ९४,९५,९६, ९७,९८ व ८० मधील घरोघरचा कचरा खाजगी रिक्षा टेम्पोमार्फत गोळा करणेकामी प्रस्तावात नमुद एकुण ८ रिक्षा टेम्पो माहे जुलै २००९ पासुन वाहनचालक,इंधन व दोन मजुर कर्मचाऱ्यांसह प्रतिदिन र.रु.७००/- प्रमाणे माहे डिसेंबर २००९ पर्यंत येणारा अपेक्षित खर्च र.रु.१०,२४,८००/- असल्याने रिक्षाटेम्पोधारक यांच्याकडून प्रतिदिन प्रति टेम्पो र.रु.७००/- या दराने मनपाचे छोटी वाहने उपलब्ध होईपर्यंत काम करुन घेण्यास व येणाऱ्या खर्च रकमेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४६९ विषय क्रमांक :- ८
दिनांक - २०.१०.२००९ विभाग - प्रशासन
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/१४३९/०९
दि.१४/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शासनाकडून वाहनचालक पदे मंजूर होईपर्यंत वाहनचालकांची आवश्यकता विचारात घेऊन प्रस्तावात नमूद एकुण ३७ कर्मचाऱ्यांना त्यांचे नावापुढे स्तंभ ५ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून आणखी ६ महिने कालावधीसाठी र.रु.८,०००/- दरमहा एकत्रित मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४७० विषय क्रमांक :- ९
दिनांक - २०.१०.२००९ विभाग - प्रशासन
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/६/कावि/५३९/०९
दि.०८/१०/२००९
विषय :- श्री.पांडुरंग निवृत्ती वेताळ,कचराकुली यांना सेवेतून काढून टाकण्यास मान्यता देणेबाबत..

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४७१ विषय क्रमांक :- १०
दिनांक - २०.१०.२००९ विभाग - वैद्यकिय
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/७/कावि/२३४९/०९
दि.१४/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भारत सरकार मंत्रालय हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर ऑफिस मेमोरेण्डम क **(B-12014/7192-CGHSCP)** दिनांक:-३१/१२/१९९३ भारत सरकार मंत्रालय हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर कडील दिनांक:-१७/९/१९९९ चे दुरुस्ती अन्वये कर्मचाऱ्यांवर अवलंबुन असणाऱ्या अविवाहीत मुलाचे वय २५ वर्षे व जो मुलगा अपंग (Physicaly व Mental) असेल त्यांचेबाबतीत वयाची अट शिथिल करुन सी.जी.एच.एस. मध्ये सुविधा उपलब्ध असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी व अधिकारी व शिक्षण मंडळ कर्मचारी व अधिकारी यांच्या अपंग पाल्यास (Physicaly व Mental) वैद्यकीय सुविधा व बिलाची प्रतिपुर्ती करुन देण्यात अडचण निर्माण होवु नये म्हणुन कर्मचाऱ्याचा पाल्य अपंग असेल (Physicaly व Mental) तो पुर्णपणे कर्मचाऱ्यावर आर्थिकदृष्ट्या अवलंबुन असेल याबाबत योग्य ते पुरावे सादर केले तर त्यास मनपा दवाखान्यात/रुग्णालयात मोफत उपचार

सोईसुविधा तसेच नियमानुसार देय इतर बिलाची प्रतिपुर्ती करुन देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४७२ विषय क्रमांक :- ११
दिनांक - २०.१०.२००९ विभाग -संगणक
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.संगणक/८/कावि/४८५/०९
दि.१५/१०/२००९
विषय : Online System करिता Security Certificate मिळविणेबाबत ..
विषय क्रमांक ११ चा विचार दिनांक २४.११.२००९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/९२२/२००९
दिनांक - २१/ १० /२००९ चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.